**<u>ठळक बातम्या</u>**

- पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातलं मतदान सुरू

- उत्तर प्रदेशामधल्या हरदोई जिल्ह्यात ३६ कोटी २३० लाख रुपये खर्चाच्या ५९४ किलोमीटर लांबीच्या प्रवेश नियंत्रित ग्रीनफिल्ड गंगा द्रुतगती महामार्गाचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- फौजदारी कायद्यांची चौकट द्वेषपूर्ण भाषणांच्या घटना हाताळण्यासाठी पुरेशी असल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

**आणि**

- उत्तरप्रदेशात तीन वेगवेगळ्या ठिकाणी आणि गुजरातमध्ये झालेल्या रस्ते अपघातात एकूण १३ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचं दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातलं मतदान आज सुरु आहे. राज्यातल्या सात जिल्ह्यांमधल्या १४२ मतदारसंघासाठी सकाळी सात वाजल्यापासून मतदान सुरु झालं.

सकाळी ११ वाजेपर्यंत ४० टक्के मतदान झालं होतं.

पश्चिम बंगालमधल्या विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात, आज मतदारांनी विक्रमी मतदान करावं असं आवाहन **प्रधानमंत्री नरेंद्र मोदी** यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात केलं आहे. विशेषतः महिला आणि युवावर्गाने मोठ्या संख्येने येऊन आपला मतदानाचा हक्क बजावावा असं त्यांनी म्हटलं आहे. मतदारांनी मोठ्या संख्येने घराबाहेर पडून मतदान करावं असं आवाहन काँग्रेस अध्यक्ष **मल्लिकार्जुन खर्गे** यांनीही समाजमाध्यमावरुन केलं आहे. तरुण तसंच पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या मतदारांनी मतदान प्रक्रियेत सामिल होऊन आपला मतदानाचा हक्क बजावावा असं खर्गे म्हणाले.

तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी तसंच भाजपा नेते सुवेंदू अधिकारी यांनी चक्राबेरिआ मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. सीपीएमचे

राज्य सचिव मोहम्मद सलीम यांनी कोलकाता इथल्या मतदान केंद्रावर तर भाजपाचे नेते मिथुन चक्रवर्ती यांनी बेलगाछिया इथल्या मतदान केंद्रावर मतदान केलं.

मतदानाच्या या टप्प्यात ३ कोटी २० लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. १ हजार ४४८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून यात २२० महिलांचा समावेश आहे. मतदान शांततेत पार पडावं म्हणून सुरक्षा दलं तैनात आहेत. केंद्रीय राखीव पोलीस दलाचे २ हजार ३२१ जवान बंदोबस्तावर आहेत. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी अतिरिक्त आयपीएस तसंच डब्ल्यूबीपीएस अधिकाऱ्यांचीही नियुक्ती केली आहे. काही तुरळक घटना वगळता मतदान शांततेत सुरु आहे.

<><><><><>

उत्तर प्रदेशामधल्या हरदोई जिल्ह्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत ३६ कोटी २३० लाख रुपये खर्चाच्या ५९४ किलोमीटर लांबीच्या प्रवेश नियंत्रित ग्रीनफिल्ड गंगा द्रुतगती महामार्गाचं उद्घाटन आज झालं.

हजारो वर्षांपासून गंगा नदी उत्तर प्रदेशाची जीवनरेखा आहे, तसंच गंगा द्रुतगती महामार्गामुळे राज्याच्या विकासाची नवी जीवनरेखा ठरेल, असं प्रतिपादन प्रधानमंत्र्यांनी महामार्गाच्या उद्घाटनानंतर हरदोई इथं घेतलेल्या सभेत केलं. या द्रुतगती महामार्गामुळे राज्यातील संपर्क व्यवस्थेत सुधारणा होईल. तसंच औद्योगिक गुंतवणूक, लॉजिस्टिक्स, शेतीमालाची विक्री आणि प्रादेशिक समतोल विकासाला चालना मिळेल, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला.

**- - होल्ड बाईट प्रधानमंत्री - -**

उत्तर प्रदेश एक्सप्रेसवेज इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट प्राधिकरणानं विकसित केलेला हा महामार्ग राज्यातील पश्चिम, मध्य आणि पूर्व भागांना एकाच मार्गाने जोडणार आहे. हा राज्यातील सर्वात लांब एक्सप्रेसवे ठरणार आहे. सहा मार्गिका असलेला हा द्रुतगती महामार्ग १२ जिल्ह्यांतून जाणार असून मेरठ ते प्रयागराज हे अंतर अवघ्या ६ तासांत गाठता येणार आहे.

दरम्यान, आज सकाळी प्रधानमंत्र्यांनी वाराणसी इथं सकाळी १४ किमीचा रोड शो केला. त्यानंतर त्यांनी काशी विश्वनाथ मंदिरात जाऊन विधीवत पूजा करत देशातील नागरिकांना सुख-समृद्धी मिळावी अशी प्रार्थना केली. प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावर हर

हर महादेव असं लिहून काही फोटो शेअर केले आहेत. काशी विश्वनाथ मंदिरात जाण्याआधी प्रधानमंत्री मोदी यांनी रोड शो केला. यावेळी रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या संख्येने उभ्या असलेल्या नागरिकांनी प्रधानमंत्र्यांचे स्वागत केलं.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी इक्वेडोरचे परराष्ट्र व्यवहार मंत्री गॅब्रिएला सोमरफील्ड यांची आज नवी दिल्ली इथं भेट घेतली. व्यापार, कृषी आणि क्षमता विकास या मुद्द्यांवर दोन्ही नेत्यांमधे यावेळी चर्चा झाली. भारताच्या नेतृत्वाखालच्या इस्रो सोलार अलायन्स आणि इंटरनॅशनल बिग  कॅट अलायन्स मधे सहभागी होण्याच्या इक्वेडोरच्या निर्णयाचं जयशंकर यांनी स्वागत केलं. गॅब्रिएला सोमरफील्ड यांचं तीन दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी आज सकाळी नवी दिल्ली इथं आगमन झालं.

**<><><><><>**

सध्या अस्तित्वात असलेली फौजदारी कायद्यांची चौकट द्वेषपूर्ण भाषणांच्या घटना हाताळण्यासाठी पुरेशी आहे, असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. द्वेषपूर्ण भाषणांसंदर्भातल्या याचिकांच्या सुनावणीवेळी न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने हा निर्वाळा आपल्या निकालात दिला आहे. या बाबतीतल्या घटनांची गुन्हे म्हणून वर्गवारी आणि शिक्षानिश्चिती या बाबी विधीमंडळाच्या कार्यकक्षेत येत असल्याचं न्यायालयानं म्हटलं आहे. मात्र  भाषणं आणि अफवा यांच्याशी संबधीत घटना या दखलपात्र गुन्हे असल्यास पोलिसांनी तक्रार नोंदवून घेणं बंधनकारक आहे, असं मत खंडपीठानं व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

उत्तरप्रदेशात तीन वेगवेगळ्या ठिकाणी आणि गुजरातमध्ये झालेल्या रस्ते अपघातांमध्ये एकूण १३ जणांचा मृत्यू झाला आहे.

**गुजरात** राज्यात सांबरकांठा जिल्ह्यात आज सकाळी खासगी बसनं व्हॅनला धडक देऊन झालेल्या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला तर तर चौघेजण जखमी झाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार हिंमतनगरला जाणाऱ्या व्हॅनला पाठी मागून वेगानं येणाऱ्या बसनं जोरदार धडक दिल्यानं हा अपघात झाला.

उत्तर प्रदेशात मैनपुरी, मुझफ्फरनगर आणि देवरिया जिल्ह्यांत काल रात्री वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या रस्ते अपघातामध्ये सात जणांचा मृत्यू झाला तर तीन जण जखमी झाले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मैनपुरी पोलिस ठाण्याअंतर्गंत शीतला देवी मंदिराजवळ पिकअप गाडीनं दुचाकीला धडक दिली. यामध्ये **तिघांचा जागीच मृत्यू झाला.** दुसऱ्या घटनते मुझफ्फरनगरच्या चरथावल इथं रस्त्यावरून चालणाऱ्या **एका महिलेला** वेगानं जाणाऱ्या गाडीनं धडक दिल्यानं तिचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर वाहनचालक पळून गेल्यानं संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी रास्तारोको केलं. तर देवरिया जिल्ह्यात काल रात्री बघौच घाट भागात गाडी झाडावर धडकून झालेल्या अपघातात **तीन जणांचा मृत्यू झाला** तर दोघेजण गंभीर जखमी झाले.

**<><><><>**

झारखंडच्या पश्चिम सिंगभूम जिल्ह्यातल्या कोल्हाण वनविभागामध्ये सुरक्षा दलं आणि नक्षलवाद्यांमध्ये आज सकाळी चकमकीला तोंड फुटलं. गोईकोरा आणि टोन्टो पोलीस ठाण्यांच्या हद्दीतल्या जंगल विभागात जिल्हा पोलीस आणि केंद्रीय राखीव पोलीस दलांच्या संयुक्त दलांनी नक्षलवाद्यांविरुद्ध सुरु केलेल्या सर्च ऑपरेशन सुरु असताना ही चकमक उडाल्याची माहिती पश्चिम सिंगभूमच्या पोलिस अधिक्षकांनी दिली.

**<><><><>**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या आगामी निवडणुकीसाठी भाजपाने पाच उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. यात सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे आणि प्रमोद जठार यांचा समावेश आहे. भाजपाचे राष्ट्रीय महासचिव अरूण सिंह यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.

**<><><><>**

देशात विजेच्या सर्वोच्च मागणीचा उच्चांक गाठला जाऊन, ती मागणी पूर्ण करण्यातही भारताला यश आलं आहे. चार दिवसांपूर्वी म्हणजे, २५ एप्रिलच्या दुपारी २५६ गिगावॉटपेक्षा अधिक विजेचा पुरवठा करून ही विक्रमी मागणी पूर्ण केली असून, त्याचवेळी शेजारी देशांना होत असलेली वीज-निर्यातही सुरळीत सुरु ठेवली.

**<><><><>**

स्पेनमध्ये सुरु असलेल्या माद्रिद ओपन टेनिसमध्ये अमेरिकेच्या हेली बॅप्टिस्टने जागतिक नामांकनात अव्वल असलेल्या आर्यना सबालेन्का हिला हरवून स्पर्धेच्या उपान्त्य फेरीत प्रवेश केला.  २४ वर्षीय हेलीने अडीच तास सुरु असलेल्या सामन्यात सबालेन्का हिला २-६,६-२,७-६ असं हरवलं.

//<><><><><>//